पुणे महानगरपालिका

✻ स्थायी समिति ✻

कार्यपत्रिका क्रमांक ४१

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. २०/१२/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिति सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

दाखल विषय

विषय क्र. १४१२

मा.शाम देशपांडे व मा.महादेव बाबर यांचे दि. २०/१२/२००७ चे पत्र.

दि. २३/१२/२००७ रोजी पुणे मनपा व चैतन्य हास्ययोग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या संमेलनास र.रुपये ५ लाख देणेसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, ग-१. महापालिका आयुक्त यांचे कार्यालय, पान क्र. ४९, अ.क्र. १६, पर्यावरण विभाग खर्च व इंटरनॅशनल अजेंडा-२१ एशियन कॉन्फरन्स (एकूण तरतुद रुपये २५ लाख)	५ लाख	---
नविन सुचविलेले काम दि. २३/१२/२००७ रोजी पुणे मनपा व चैतन्य हास्ययोग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या संमेलनास देणेसाठी	---	५ लाख

विषय क्र. १४१३

मा.अरुण धिमधिमे व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २०/१२/२००७ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १२५३ दि. ४/१२/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे महानगरपालिकेसाठी १५० संगणक पुरविणे **(Supply of 150 Computers to Pune Municipal Corporation)** या कामाबाबत)

विषय क्र. १४१४

सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरीता नोटीसा व वॉरंटची प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी व छपाईसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(२) अन्वये सन २००६-०७ या वर्षाचे मान्य ठेकेदार मे.मल्टीसेल्स, कर्वेरोड यांचेकडून सदर कामासाठी सन २००६-०७ मधील दराने काम करुन घेणेस व करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआवि/९१८ दि. १९/१२/२००७ चे पत्र.

(टिप :- प्रस्तुत कामी पुरेसा कालावधी नसल्याने व सदरचे काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने व सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरीता सदरचे काम पूर्ण केलेले मे.मल्टीसेल्स, कर्वेरोड या संस्थेने सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील दरानेच काम पूर्ण करणेबाबत संमती दर्शविली आहे.)

विषय क्र. १४१५

महापौर चषक कबड्डी स्पर्धेसाठी र.रुपये १२ लाख पुणे जिल्हा कब्बडी असोसिएशनला देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/जिंघ/९१९ दि. २०/१२/२००७ चे पत्र.

विषय क्र. १४१६

मा.दिलिप उंबरकर व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २०/१२/२००७ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १०३७ दि. ७/११/२००७ चा फेरविचार करुन मुळ प्रस्ताव मान्य करण्यात यावा. (वॉर्ड क्र. ५९ मध्ये विविध विकासाची कामे करणे तसेच वॉर्ड क्र. ५९ मध्ये किष्किंधानगर व सुतारदरा याठिकाणी पाणी पुरवठ्यात सुधारणा कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.)

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने व प्राणीसंग्रहालये, पान क्र. १८८, अ.क्र. ९४, शहरात विविध ठिकाणी उद्याने विकसित करणे व विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस-२७), पान क्र. ३०५, अ.क्र. ८, वॉर्ड क्र. ५९ किष्किंधानगर येथे उद्यान विकसित करणे	१० लाख	---
नविन सुचविलेले काम		
१) वॉर्ड क्र. ५९ मध्ये विविध विकासाची कामे करणे	---	५ लाख
२) वॉर्ड क्र. ५९ मध्ये किष्किंधानगर व सुतारदरा याठिकाणी पाणी पुरवठ्यात सुधारणा कामे करणे	---	५ लाख

विषय क्र. १४१७

मा.सौ.अलका खाडे यांचे दि. १८/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४, कळस-विश्रांतवाडी येथील विविध भागात अंतर्गत रस्ते व बोळ सिमेंट काँक्रीट किंवा इंटरलॉकींग ब्लॉकने बनविण्यासाठी र.रुपये ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, १९.भाजीमंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १९६, अ.क्र. २०, शहरात विविध ठिकाणी भाजी मंड्या बांधणे व विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एस-२९), अ.क्र. १, पान क्र. २८१, वॉर्ड क्र. ४, स.नं. ११६, १२२ येथे भाजी मंडई व मटण मार्केट बांधणे	८ लाख	---
नविन सुचविलेले काम		
वॉर्ड क्र. ४, कळस-विश्रांतवाडी येथील विविध भागात अंतर्गत रस्ते व बोळ सिमेंट काँक्रीट किंवा इंटरलॉकींग ब्लॉकने बनविणेचे काम पुर्ण करणे	---	८ लाख

विषय क्र. १४१८

वॉर्ड क्र. १४४ संतोषनगर, दत्तनगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार अनिल भिमसेन कोनुरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९८,९४८/- पेक्षा ३% कमी)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,५३,९७९=६० अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/९२२ दि. २०/१२/२००७ चे पत्र.

शरद समेळ,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका